CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २४० वा | सोमवार दि. २६ जून २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

### आता तरी उद्धवजींनी समजून घ्यायला हवे : फडणवीस



**मुंबई ।** उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी उद्धव ठाकरेंना एका ट्वीटने उत्तर दिलं. त्या ट्वीटला मिळालेल्या समर्थनाने आजपर्यंतचे सर्व विक्रम मोडले आहेत. त्यावरून तरी उद्धव ठाकरेंनी समजून घ्यायला हवे की, लोकांना काय अपेक्षित आहे, असे बोलत देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा एका ठाकरेंवर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी उद्धव ठाकरेंना एका ट्वीटने उत्तर दिलं.

## न्यूज कॉलम

### जोगशेलू गावात एकास मारहाण

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यातील जोगेशेलू गावात राहणारे नितीन जगन्नाथ देसले (४८) हे भूषण आधार देसले, जगदीश आधार देसले, प्रकाश आधार देसले रा. जोगशेलु यांच्या पक्षाला दाखला देत नाहीत. या कारणावरून तिघांनी नितीन देसले व त्यांच्या साथीदारांना हाताबुक्याने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी तिघांनी त्यांचा मुलगा जयकुमार नितीन देसले याचे डोक्यावर दगडाने मारून त्यास जखमी केले. ही घटना दि.२२ रोजी दुपारी १ ते १.३० वाजेच्या सुमारास योगशेलू गावात घडली. याप्रकरणी नितीन देसले यांनी शिंदखेडा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून वरील तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

### तरुणाला मारहाण, पाच जणांवर गुन्हा

**धुळे ।** काहीही कारण नसताना पाच जणांनी मिळून बापुराव हिरामण गोपाळ याला मारहाण करण्यात आली. ही घटना नवलनगर गावात घडली. यात जखमी झालेल्या बापुराव याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी तालुका पोलिसात गुन्हा दाखल झाला.

# स्टेटमेंट बघून घटनाबाह्य मुख्यमंत्री यांचा बालिशपणा दिसतो : आदित्य ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

पहिल्याच पावसात मुंबईतील नालेसफाईचा फज्जा उडाल्याचं चित्र असून अंधेरीसह इतर भागात कमरेपर्यंत पाणी साचल्याचं दिसून आलं. यावरुन आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. तर मुख्यमंत्र्यांनी या संबंधित महापालिकेच्या अधिकाऱ्यावर कारवाईचा इशारा दिला आहे.

देर आये दुरुस्त आये, या म्हणीप्रमाणे ओढ घेतलेल्या पावसाने शनिवारी मुंबईत जोरदार एन्ट्री केली आणि पहिल्याच पावसाने मुंबईची दाणादाण उडवली. मुंबईत ठिकठिकाणी पाणी साठलं होतं. पाण्याचा निचरा होत नसल्यानं मुंबईकरांना पाण्यातून वाट काढावी लागत होती. तर अनेक ठिकाणी गाड्या अडकल्या होत्या. मुंबईतल्या पहिल्याच पावसाने नालेसफाईच्या दाव्यांची पोलखोल केलीय. अंधेरी भागात झालेल्या पावसाने पाणीच पाणी अशी स्थिती रस्त्यावर झाली होती. पाण्याचा प्रवाह इतका जोरात होता की, लोकांना आधार देऊन सुरक्षित ठिकाणी घेऊन जावं लागत होतं. पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या एका महिलेला अशाच प्रकारे सुरक्षित ठिकाणी नेण्यात आलं. काही चार चाकी वाहनांच्या टायरच्या लेव्हलपर्यंत पाणी आलेलं पाहायला मिळालं.

मुंबईतील नालेसफाईवरीन आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले की, मुंबईमध्ये काल अनेक ठिकाणी पाणी भरले. मुख्यमंत्री स्वतः नाल्यात उतरले, पण नालेसफाई झाली नसल्याचं स्पष्ट झालं आहे. मुंबईकरांच्या प्रश्नाबाबत मुंबई मनपाने काळजी घ्यायला हवी होती. एका ठिकाणी इमारत कोसळली, लोकांच्या जीविताशी खेळ सुरू असून याची चौकशी झाली पाहिजे. गोवंडीत मॅनहोलमध्ये उतरलेले दोन कामगार गुदमरून मेले, त्याला महापालिका प्रशासन जबाबदार आहे. या ठिकाणी तंत्रज्ञानाचा उपयोग करायला पाहिजे. अशा दुर्घटना होऊ नयेत म्हणून काम करायला पाहिजे, अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. नगरसेवक नाहीत म्हणून मॉनिटरिंग करण्यास कोणी नाही. त्यामुळे प्रशासक आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

दरम्यान मुंबईसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलाय. तर काही जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवस ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे, सातारा, नाशिकमध्येही ही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. रायगड आणि रत्नागिरीमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. रायगडमध्ये पुढचे सलग चार दिवस पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे.



### मुंबईतील पावसाबाबत योजना काय?

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, आज मी येथे मीलन भुयारी मार्गावर असून काल तासाभरात सुमारे ७० मिमी पाऊस पडला. असे असतानाही येथे वाहतूक ठप्प झाली नाही, कारण येथे पाणी साठवण टाकी बांधण्यात आली आहे. येथे फ्लडगेटही बसविण्यात आले आहे. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, पावसाळ्यात लोकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी मी विभागाला निर्देश दिले आहेत.**

### सरकार जबाबदार : गायकवाड

**पहिल्याच पावसात मुंबईत अंधेरी सबवे, एलबीएस मार्ग, साकीनाका ९० फिट रोड, माटुंगा, पश्चिम द्रुतगती मार्ग तसेच महालक्ष्मी, दादर, माहीम, धारावी, परळ, सायन, किंग सर्कल, कुर्ला, चेंबूर, अंधेरी, मुलुंड, दहिसर आदी ठिकाणच्या सखल भागांत पाणी साचले होते. वाहतुकीचा बोजवारा उडाला. त्यामुळे महानगर पालिका आणि सत्ताधाऱ्यांनी मान्सूनपूर्व तयारीचे केलेले सर्व दावे पहिल्याच दिवशी फोल ठरलेले आहेत.शिंदे-फडणवीस सरकार आणि मनपा अधिकारी धांदात खोटे बोलले असल्याचा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला.**

### तीन मजली इमारत कोसळली

**विद्याविहार येथील तीन मजली प्रशांत निवास इमारत खचली. इमारत खचून सात तास उलटले तरी बचावकार्य सुरुच आहे. सततच्या पावसामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण होत आहेत. तीन जणांना वाचवण्यात एनडीआरएफला यश आलेय. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या कुटुंबापैकी अलका आणि नरेश पालंडे अजून ही अडकले आहेत. एनडीएआरएफ ने शर्तीचे प्रयत्न करुनही या दोघांना बाहेर काढण्यात यश आले नाही. पावसामुळे पाणी साचले आहे. पावसामुळे इमारतीचा भाग खचल्याचं बोललं जात आहे.**

# ओबीसींना आपले हक्क मिळण्यासाठी जातनिहाय जनगणना आवश्यक



### छगन भुजबळ यांचे आवाहन

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशात जातनिहाय जनगणना झाली तरच ओबीसी समाजाला आपले हक्क मिळतील आणि तेव्हाच आपल्या देशाची सहिष्णू, सौहार्दपूर्ण, धर्मनिरपेक्ष देश म्हणून प्रतिमा कायम राहील. असे सांगत देशात जोपर्यंत जातनिहाय जनगणना होत नाही तोपर्यंत आपला लढा निकराने सुरू ठेवावा लागेल. असे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले.

माजी पंतप्रधान व्ही.पी सिंह यांच्या जयंतीनिमित्त दिल्लीच्या कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सामाजिक न्यायाचा वारसा हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या सोहळ्याच्या प्रारंभी छगन भुजबळ यांच्यासह मान्यवरांनी माजी पंतप्रधान आणि ओबीसींचा मसिहा म्हणून ओळखले जाणारे व्ही.पी. सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

याप्रसंगी जेडीयू खा.गिरिधरी यादव, सीपीआयचे डी राजा, डीएमके खासदार पी विल्सन, ज्येष्ट ओबीसी विचारवंत प्रो. कांचा इलाई, बीएसपी खा.कूनवर दानिश अली, जेएनयुच्या माजी कुलगुरू डॉ. शेफालिका शेखर, कार्यक्रमाचे आयोजक त्रुठ सिकर्स इंटरनॅशनल या संस्थेचे सुनिल सरदार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी छगन भुजबळ पुढे म्हणाले की, व्ही.पी. सिंह जयंती साजरी करण्यासाठी आज येथे उभा राहिल्याचा मला अभिमान वाटतो. आज व्ही. पी. सिंह यांची जयंती आहे, मात्र त्यांचे योगदान लोकांना का आठवत नाही? हा मोठा प्रश्न आहे. मागास समाजातील लोक त्याला का विसरले, हा चर्चेचा विषय असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. देशाच्या पंतप्रधान पदावर व्ही.पी.सिंह यांनी केवळ ११ महिने कारभार केला. परंतु याच काळात त्यांनी हजारो वर्षांपासून मागासलेल्या लोकांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी महत्वाची पावले उचलली. त्यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी देशात मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्या. त्यामुळे देशातील निम्म्या लोकसंख्येला म्हणजेच ओबीसींना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देऊन त्यांनी देशाची आणि समाजाची दिशा कायमस्वरूपी बदलून टाकली आणि भारतातील लोकशाहीचा विस्तार वंचितांपर्यंत पोहोचवला असेही ते म्हणाले. समतेवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांनी आतापासून आरक्षणविरोधी लोकांबरोबर संघर्ष करावा लागणार आहे. संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, ही मागणी पूर्ण होईपर्यंत हा लढा निकराने सुरू ठेवावा असे आवाहन त्यांनी केले.

# आयजींचा जुगारअड्ड्यावर छापा; ६६ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**धुळे । प्रतिनिधी**

बंद पडलेल्या पोल्ट्रीफार्ममध्ये चादरी टाकून झन्नामन्ना प्रकारचा जुगाराचा डाव सुरू असताना नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या पथकाने छापा टाकून ५४ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यापूर्वी पोलिसांना पाहून काहींनी चारचाकी गाड्या जागेवर सोडून पळ काढला. तब्बल ६६ लाख ४५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. त्यात १३ लाख २९ हजारांच्या रोख रकमेचा समावेश आहे.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पळासनेर गावाजवळ जय माता दी ढाब्यामागे पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्डा चालवला जात असल्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक बी. जी. शेखर पाटील यांना माहिति मिळाली होती. त्यांच्या आदेशानुसार नियुक्त विशेष पथकाने रात्रीच्या वेळेला छापा टाकला असता पत्यांचा डाव रंगलेला असताना पोलिसांची चाहूल लागल्याने जुगारी बिथरले. त्यांची एकच धावपळ उडाली. मात्र, पोलिसांनी जुगारअड्ड्याची सर्वच दिशांनी नाकाबंदी केली होती. तथापि, अंधार आणि नाल्याचा आडोसा घेऊन पळण्यात काही जण यशस्वी ठरले तरी पोलिसांना काही जुगारींना ताब्यात घेण्यात यश आलं आहे.



घटनास्थळावरून पोलिसांनी जुगारअड्डा चालविणाऱ्या चौघांसह तब्बल ५४ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत १३ लाख २९ हजार रुपयांची रोकड, दोन लाख ५६ हजार रुपये किमतीचे ४६ मोबाईल फोन, दोन लाख रुपये किमतीच्या सहा दुचाकी, ४८ लाख ५० हजार रुपये किमतीच्या आठ चारचाकी गाड्या आणि १० हजार रुपये किमतीचे दोन गालिचे असा एकूण ६६ लाख रुपयांचा मुद्देमाल बी. जी. शेखर पाटील यांच्या पथकातील पोलिसांनी जप्त केला आहे.जुगारअड्डा चालवल्याच्या संशयावरून जागामालक सुभाष शिंदे, राघव शिरसाट, तर झन्नामन्ना जुगार खेळल्याच्या संशयावरून अन्य संशयितांविरोधात सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अटक केलेल्या जुगाऱ्यांमध्ये मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील रहिवाशांचा भरणा आहे. मध्य प्रदेशातून पळासनेरला येऊन मोठ्या प्रमाणावर जुगार खेळवण्यात येत असल्याचा संशय आहे. महाराष्ट्रातून अमळनेर, पळासनेर आणि दोंडाईचा येथून तेथे जुगारासाठी गेलेल्यांनाही ताब्यात घेण्यात आले.

# गोमांस तस्करीचा संशय, जमावाच्या मारहाणीत एकाचा मृत्यू

**नाशिक । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी इगतपुरीच्या कसारा घाटात गोमांस घेऊन जाण्याच्या संशयातून एकाच दरीत पडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. आता पुन्हा सिन्नर घोटी मार्गावर गंभीरवाडी जवळ दोन जणांना गोमांस घेऊन जाण्याच्या संशयातून मारहाण करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. दोघांनाही जवळच्या एसएमबीटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरु असताना एकाचा मृत्यू झाला आहे.

इगतपुरी परिसरातील पंधरा दिवसांतील ही दुसरी घटना असून आजच्या घटनेने पुन्हा परिसर हादरला आहे. सिन्नर-घोटी महामार्गावरील गंभीरवाडी जवळ गोमांस घेऊन जाण्याच्या संशयावरून दोन व्यक्तींना अज्ञात दहा ते पंधरा जणांकडून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. स्थानिकांनी त्यांना जवळच असलेल्या धामणगाव येथील एसएमबीटी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले होते, यातील एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून दुसऱ्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी घोटी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास घोटी पोलीस करत आहेत. इगतपुरी तालुक्यातील घोटी पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या एसएमबीटी कॉलेजजवळ ही घटना घडली. रविवारी मध्यरात्री साडे दहाच्या सुमारास गोमांस घेऊन जाण्याच्या संशयावरून हे प्रकरण घडले. यात एकाचा मृत्यू झाला तर दुसरा एकजण गंभीर स्वररूपात जखमी आहे.

# जटायू बचाव, रोपवे हटाव

## अंजनेरी-ब्रह्मगिरीच्या प्रस्तावित रोपवेला विरोध

### रोपवेची लांबी ५.७ किलोमीटर, ३७५ कोटी रुपये येणार खर्च

**नाशिक । प्रतिनिधी**

अंजनेरी-ब्रह्मगिरीच्या खासदार प्रणित प्रस्तावित रोपवेची लांबी ५.७ किलोमीटर, ३७५ कोटी रुपये खर्चाच्या रोपवेला विरोध करण्यासाठी काल पुण्यभूमी ब्रह्मगिरी येथे जटायू पूजन करून ग्रामस्थ, पर्यावरण प्रेमींकडून विरोध करण्यात आला. अंजनेरीची जैवविविधता ब्रह्मगिरीची, पवित्रता अबाधित राखण्यासाठी मेटघर ग्रामस्थ, त्र्यंबकवासी, पर्यावरण प्रेमी एकवटले आहेत. नाशिक येथील हुतात्मा स्मारकात पर्यावरण प्रेमींच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे काल ब्रह्मगिरी पायथ्याशी जटायू पूजन करून या अभियानाची सुरुवात करण्यात आली.




केंद्र सरकारच्या पर्वतमाला योजने अंतर्गत पर्यटनास चालना देण्यासाठी नाशिकच्या खासदारांचे ब्रह्मगिरी अंजनेरी रोपवे हे स्वप्न आहे. पर्वतीय प्रदेशातील वाहतूक सुलभतेसाठी असणाऱ्या पर्वतमाला योजनेचा खासदारांकडून गैरवापर करून केंद्र सरकारची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे. जगविख्यात अती दुर्मिळ जेवविविधतेसाठी प्रसिद्ध अंजनेरी पर्वतताला अभयारण्य घोषित करण्यासाठी केंद्र सरकारचे प्रयत्न सुरु असतांना येथील खासदारांकडून रोपवे सारख्या जेवविविधतेस धोकादायक ठरणाऱ्या प्रकल्पाचे स्वप्न बघणे चुकीचे ठरेल. लाखो भाविकांच्या पायी वारीच्या धार्मिक परंपरेने ब्रम्हगिरी समृद्ध असतांना पर्यटन वाढीसाठी निसर्गाचे नुकसान करून रोपवे करण्याची गरजच काय? असा प्रश्न सर्व भाविक विचारत आहेत.

अंजनेरी गावात शेतीपूरक व्यवसायास चालना देवून, दैनंदिन सुविधा पुरविण्याचे काम करणे हे रोपवे पेक्षा जास्त गरजेचे आहे.

येथील जंगल वाचविण्यासाठी ग्रामस्थ व पर्यावरण प्रेमी नागरिक लवकरच वनमंत्र्यांची भेट घेणार असून रोपवे विरुद्धचा लढा तीव्र आंदोलन करून अधिक बळकट करण्याचा निर्णय याप्रसंगी सर्व निसर्ग प्रेमी व ग्रामस्थांकडून घेण्यात आला. रोपवेचा रोप काढून प्रभू राम भक्त जटायूंचा अधिवास टिकवून राहण्यासाठी काल ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी मेटघर निवासी, त्रंबकवासी, धर्मगुरू गिरीजानंद सरस्वती महाराज, आनंद आखाडा, त्रंबकेश्वर, मेटघरचे सरपंच झोले, ललित गुरू लोहगावकर, प्रकाश दिवे, कैलास देशमुख, हरित ब्रम्हगिरी सदस्य व रमेश अय्यर, कुलदीप कोर, डॉ. संदीप भानोसे, भारती जाधव, अरविंद निकुम, जगबीर सिंग, नितीन रेवगडे, जयेश पाटील, सुरज अकोलकर, हेमंत जाधव, शिवराज रेवगडे, टीम वृक्षवल्ली, पांजरपोळ ग्रुप व इतर असंख्य अनेक २०० पेक्षा जास्त पर्यावरण प्रेमी नागरिक उपस्थित होते.

# ओवी ते अभंग या काव्य प्रकारांचा अभ्यास केल्याशिवाय दर्जेदार काव्य निर्माण होत नाही : रामदास वाघ

**नाशिक । दिलीप साळुंके**

काव्य लेखन करताना ओवी पासून अभंगापर्यंतच्या सर्व काव्यप्रकारांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय दर्जेदार कविता निर्माण होऊ शकत नाही. दर्जेदार कवीतांच्या निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. कविता जगण्याचा आदर्श विचार देते म्हणून कवी होतांना त्यातला माणूस अनुभवता आला पाहीजे असे विचार जेष्ठ साहित्यिक रामदास वाघ यांनी येथे व्यक्त केले. यावेळी विश्वास को-ऑप बँकेचे संस्थापक विश्वास ठाकूर, अहिराणी भाषा अभ्यासक बापूसाहेब हटकर, उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळाचे विकास पाटील कार्याध्यक्ष प्राचार्य प्रशांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

उत्तर महाराष्ट्र खान्देश विकास मंडळ संचलित जागतिक अहिरानी भाषा संवर्धन परिषदेतर्फे रिमझिम काव्य संमेलन व साहित्यिक गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते



यावेळी अध्यक्ष स्थानावरून श्री वाघ बोलत होते. प्रमुख अतिथी विश्वास ठाकूर, बापूसाहेब हटकर आदिंनीही अहिराणी भाषा संवर्धन चळवळ व्यापक स्वरूपात केली त्यासाठी आम्ही निश्चितच सोबत राहून सहकार्य करू असे आश्वासन देऊन रेडीओ विश्वास आपल्यासाठी सदैव साथ देईल

प्रारंभी प्राचार्य प्रशांत पाटील आणि विकास पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजन संदर्भात भूमिका मांडून सर्व साहित्यिकांचे स्वागत केले. कालिकामाता मंदिर ट्रस्टच्या बंदिस्त सभागृहात रिमझिम काव्य संमेलन झाले यात सुमारे ५१कविंनी आपल्या मराठी व अहिराणी कविता सादर केल्या. अहिराणी बोली भाषेच्या जतन आणि संवर्धनार्थ आयुष्यभर केलेल्या सेवेच्या प्रती जीवन गौरव पुरस्कार देऊन डॉ. रमेश सूर्यवंशी, विश्राम बिरारी यांना सन्मानित करण्यात आले. काव्य संमेलनातील सहभागींना अहिरानी भाषा संवर्धक सारस्वत डॉ. दामोदर गोविंद बोरसे पुरस्कार बापू पिंगळे, डॉ.फुला बागुल, रमेश बोरसे, सौं. लतिका चौधरी, नाना माळी, प्रकाश पाटील सौ.सुमती पवार, डॉ.जितेंद्र देसले, विजय निकम, जितेन्द्र चव्हाण, सौ.वर्षा पाटील, डॉ.प्रा.प्रकाश माळी, आलियागोहर जाकीर शेख, यशवंत पगारे, काशीनाथ महाजन, डॉ.आनंद सूर्यवंशी,मनिषा पाटील,हर्षदा किरण शेलार,गोपाल परमार,डॉ.मनिलाल शिंपी, आशा शिरुडे, विवेक पाटील,देवदत्त बोरसे, कैलास भामरे,विनोद शेलकर,आबा आहेर,सविता पाटील, प्रा.सुभाष शेलार, सुनिता पाटील, संजय सोनार, वि. ना. बागुल, विजय निकम, मकरंद जाधव, रोहिणी कोठावदे, रामचंद्र गुरव, भगवान पाटील, रमेश महाले, मोहन पाटील, प्रतिक अलई, प्रा.गिरीश पाटील, मधुकर हुजरे,विद्या पाटील, बबलू आहीरे, रोहित ठाकुर, नितीन अहिरराव, विजय सूर्यवंशी, दिपक चव्हान,सुरेखा चव्हाण, सुधाकर भामरे, जितेंद्र चौधरी, संजय धनगव्हाळ, प्रा.डॉ.दौलत सोनवणे यांना प्रदान करण्यात आले. खान्देश मराठा मंडळ, नाशिक यांच्यातर्फे संपुर्ण नियोजनठ करण्यात आले. शेवटी उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळ संचलित जागतिक अहिराणी भाषा संवर्धन परिषदेतर्फे अध्यक्ष विलास पाटील यांनी आभार मानले.

# धुळ्यात दोघांना मारहाण २८ हजारांचा ऐवज लुटला

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील वडजाई रोड परिसरात मोटर सायकलस्वार दोघा युवकांना आठ ते दहा जणांनी मारहाण केली. त्यांच्याजवळील २८ हजारांचे दागिने लुटून नेले. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

भौतिक अजय वर्मा, नयन राजेश बोरा , दोघे रा. आदिनाथ पार्क नटराज चित्रपटगृहाजवळ) दोघे मोटरसायकलने वडजाई रोड परिसरातून काल रात्री अकराच्या सुमारास जात होते. मोटरसायकलला हूल दिल्यावरुन आठ ते दहा जणांनी त्यांच्याशी वाद घातला, शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केली. नयन बोरा याच्या डोक्यावर हत्याराने मारुन दुखापत केली. भौतिक आणि नयन यांच्या जवळील सोन्याची चैन आणि चार हजारांची रोकड असा एकूण २८ हजारांचा ऐवज लुटूनला. मारहाणीत नयनला दुखापत झाली असून त्याला रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी भौतिक वर्मा याने दिलेल्या फिर्यादीनुसार चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात आठ ते दहा जणांविरुद्ध लुटमार, मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. संशयितांची नावे अद्याप समजू शकलेली नाही. पोलीस निरीक्षक डी. पी. महाजन तपास करीत आहेत.

## खोडसाळ चीन

भारत विरोधी अतिरेक्यांवर निर्बंध आणण्याचे प्रयत्न चीन २००६पासून नकाराधिकार वापरून हाणून पाडत आहे. आशियातील वर्चस्व कायम राखण्यासाठी पाकिस्तानच्या भूमीचा होणारा गैरवापर तो मान्य करत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा मंडळाच्या एका बैठकीत भारताने चीनला-त्या देशाचे नाव न घेता खडसावले हे चांगले झाले. त्याला कारण आहे चीनचे पाकिस्तान प्रेम आणि भारत विरोधी भूमिका. मुंबईवर २००८ मध्ये झालेल्या हल्ल्याचा सूत्रधार साजिद मीर याला जागतिक दहशतवादी घोषित करण्यासाठी अमेरिकेने सुरक्षा समितीत मांडलेला ठराव चीनने अडवला. या ठरावाला भारताने अनुमोदन दिले होते. मीरला चीनने वाचवण्याची ही पहिली वेळ नाही. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये संयुक्त राष्ट्रांत हा ठराव आला तेव्हा चीनने तो रोखला (होल्ड) होता. आता तर त्याने तो अडवला (ब्लॉक) आहे. त्यासाठी त्याने कोणतेही सबळ कारण दिलेले नाही. पाकिस्तानमध्ये असलेल्या लष्कर ए तोयबा या अतिरेकी संघटनेचा साजिद मीर हा एक म्होरक्या आहे. मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या हल्ल्यातील त्याच्या सहभागाबद्दल तो भारताला हवा आहे. अमेरिकेने त्याला पकडण्यासाठी ५० लाख डॉलर्सचे बक्षीसही जाहीर केले आहे. अमेरिकेखेरीज अन्य अनेक देशांनी त्याला दहशतवादी मानले आहे. मात्र, त्याच्यावर कोणतीही कारवाई होऊ नये यासाठी चीन प्रयत्न करत आहे. पाकिस्तानला चीनची साथ आहे हे यातून पुन्हा एकदा उघड झाले. त्या बद्दलच भारताने जगासमोर चीनची कान उघाडणी केली. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा मंडळाने 'अल कायदा निर्बंध समिती' अशी एक समिती स्थापली आहे. १२६७व्या ठरावानुसार ती स्थापल्याने तिचा उल्लेख त्या क्रमांकासह होतो. मुंबईवरील हल्ल्याचे नियोजन, तयारी व अंमलबजावणी हे सर्व साजिद मीरच्या देखरेखीखाली झाले असे अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याचे मत आहे. २६/११चा हल्ला केवळ मुंबई या एका शहरावर नव्हता, तर तो मानवी संस्कृतीवरील हल्ला होता असे जगाचे मत आहे. त्यामुळे साजिद मीरला जागतिक दहशतवादी घोषित करणे आणि त्याला भारताच्याही ताब्यात देणे आवश्यक आहे. तो मरण पावल्याचे पाकिस्तानने मध्यंतरी जाहीर केले; पण त्यावर कोणी विश्वास ठेवला नाही, उलट पाकिस्तानकडे पाश्चात्त्य देशांनी त्याच्या मृत्यूच्या पुराव्याची मागणी केली. अतिरेक्यांना होणारा पैशाचा पुरवठा रोखण्यासाठी असलेल्या फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या दबावामुळे पाकिस्तानला आर्थिक मदत मिळणे अवघड झाले होते. त्यामुळे मृत झालेला साजिद मीर पुन्हा उगवला, त्याच्यावर खटला चालवून त्याला पंधरा वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली; पण म्हणून त्याच्या कारवाया थांबल्या आहेत, असे मानता येत नाही. मुंबईवरील हल्ल्यातील एक आरोपी डेव्हिड हॅडले याने मुंबईच्या व नंतर अमेरिकेतील न्यायालयात जबाब देताना मीरचे नाव घेतले होते. अमेरिकेतील 'एफबीआय' या गुप्तहेर संघटनेनेही त्याला या हल्ल्याचे सूत्रधार मानले आहे. या शिवाय त्याच्याविरुद्ध अन्य पुरावेही आहेत. मुंबईतील हल्लेखोरांना दूरध्वनीवरून सूचना देणारी व्यक्ती साजिद मीर होता हे सिद्ध झाले आहे. त्या संभाषणाची ध्वनिफीत भारताचे प्रतिनिधी प्रकाश गुप्ता यांनी वाजवली. जो अतिरेकी आहे हे सिद्ध झाले आहे त्याला क्षुद्र भू-राजकीय हितसंबंधांमुळे जागतिक दहशतवादी ठरवता येत नाही, याचा अर्थ दहशतवाद विरोधी जागतिक रचनेत काही गंभीर दोष आहेत असा होतो, अशा आशयाच्या शब्दांत गुप्ता यांनी चीनवर टीका केली. पाकिस्तानातील एखाद्या अतिरेक्यावर निर्बंध लादण्याचा ठराव आला, की तो अगोदर तांत्रिक मुद्द्यांवर रोखायचा व नंतर पुढच्या टप्प्यात तो पूर्ण अडवायचा ही खेळी चीनने अनेकदा खेळली आहे. जैश ए महमदचा म्होरक्या मसूद अझहरच्या विरोधातील ठराव चीनने अनेक वर्षे रोखला होता. पाकिस्तानला चीन आर्थिक मदत तर देत आहेच; पण त्या बदल्यात तेथील बंदरे ताब्यात घेऊन भारताभोवती फास आवळण्याचा त्याचा डाव आहे. अमेरिका व पाश्चात्य देशांना विरोध व त्यांची अडवणूक ही देखील चीनची भूमिका आहे. जागतिक महासत्ता बनण्याचा प्रयत्न करणार्या चीनचा अतिरेक्यांचा संरक्षक असा चेहेरा समोर येत आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरील चीनचा खोडसाळपणा भारतासाठी घातक ठरत आहे.

# किशोरवयीन मुलांमध्ये नशेचे वाढते प्रमाण अन् पालकांची भूमिका

**(आज जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन)**



अंमली पदार्थांची वाढती तस्करी आणि ड्रग्जच्या आहारी जात असलेली तरुण पिढी हे संपूर्ण मानवजातीसाठी चिंतेचा विषय बनला आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीच्या बातम्या रोज वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांवर पाहायला व वाचायला मिळतात. अंमली पदार्थांचा हा व्यापार झपाट्याने वाढत असून त्यात तरुण पिढी बरबाद होत आहे. नशा हे नाश चे दुसरे नाव आहे, जे माणसाच्या मेंदूला नियंत्रित करून त्याला संपूर्णतः उद्ध्वस्त करते. शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक अशा प्रत्येक प्रकारे नशा माणसाला पोकळ बनवते. व्यसनामुळे रोग, ताण, शारीरिक असंतुलन, गोंधळ, द्वेष, क्रोध यांसारख्या परिस्थितींमध्ये वाढ झाल्याने कुटुंबात कलह वाढतो. गुन्ह्यांमध्ये वाढ होण्यात नशा मोठी भूमिका बजावते, अर्ध्याहून अधिक गुन्हे हे नशेत किंवा नशेसाठी केले जातात. आजकाल गुन्हेगारी झपाट्याने वाढली असून अंमली पदार्थांचा अवैध व्यवसायही शिगेला पोहोचला आहे.

अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनांना समाजात तुच्छतेने पाहिले जाते, कुटुंबातील लोक आणि नातेवाईकही त्यांच्यापासून दूर पळतात. नशेत पैशाचा अपव्यय होत असल्याने समाजातील प्रतिष्ठाही झपाट्याने कमी होते. नशेत माणसाची विचारशक्ती कमकुवत होते. अंमली पदार्थांच्या आहारी गेलेले लोक अस्वस्थ राहतात, जीवनातील आनंद नाहीसा होऊ लागतो. लोकांकडून तिरस्कार होतो. काही वेळा तर कुटुंबातील सदस्य आणि शेजारी व्यसनाधीन लोकांना इतके कंटाळतात की ते त्यांच्या मृत्यूची इच्छा देखील करू लागतात. अंमली पदार्थांच्या व्यसनींना समाजात कोणीही चांगले मानत नाही. व्यसनाधीनांना कोणी कामावर ठेवू इच्छित नाही, कारण ते व्यवस्थित कामे करीत नाहीं परिणामी, आर्थिक अडचणींमुळे ते स्वतःच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाहीत. नशेच्या आहारी जाण्यासाठी व्यसनाधीन गुन्हे करण्यासही तयार असतात. त्यामुळे समाजात दारिद्र्य, नशा आणि गुन्हेगारीचे चक्र असेच सुरू असते.

अंमली पदार्थांचे सेवन आणि अवैध तस्करी विरुद्ध आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी २६ जून रोजी जगभरात जनजागृती करण्यासाठी पाळला जातो आणि अंमली पदार्थांपासून मुक्त जग साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या कृती आणि सहकार्याला बळकटी दिली जाते. अंमली पदार्थांचा वापर करणाऱ्या अनेक व्यसनींना कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो आणि परिणामी त्यांना योग्य उपचार, आधार मिळत नाही. या वर्षी २०२३ ची थीम आहे लोक प्रथम: कलंक आणि भेदभाव थांबवा, प्रतिबंध मजबूत करा. या वर्षीच्या मोहिमेचा उद्देश अमली पदार्थांचे व्यसन असलेल्या लोकांशी आदर आणि सहानुभूतीने वागण्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करणे आहे; जेणे करून त्या व्यसनींना आपल्या सर्वांच्या सहकार्याने नशामुक्त होऊन पुन्हा सन्मानाने जगण्याची संधी मिळेल.

नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्सने केलेल्या अभ्यासानुसार, देशातील किशोरवयीन मुलांमध्ये तंबाखू आणि दारू ही सर्वात सामान्य व्यसनं आहेत, मग इनहेलेंट्स आणि भांग आहेत. तंबाखूचा वापर सुरू केलेले सरासरी वय १२ वर्षे दर्शविले, आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे की ४६% झोपडपट्टीत राहणाऱ्या किशोरवयीन मुलांनी अगदी लहान वयात धूम्रपान आणि तंबाखू, तसेच दारू आणि गांजा यांचा वापर सुरू केला होता. शहरांतील अनेक झोपडपट्ट्यांमध्ये किंवा अनेक ग्रामीण भागात अगदी ६-७ वर्षे वयोगटातील मुलेही ज्वलनशील रसायने व अंमली पदार्थांचा उग्र वास घेतांना किंवा तंबाखू खाताना दिसतात. २०२२ मध्ये २६,६२९ किशोरवयीन मुलांनी अंमली पदार्थ सेवन केल्याची नोंद झाली आहे, जी २०१६ च्या तुलनेत ३००% वाढ दर्शवते. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने केलेल्या राष्ट्रीय व्यापक सर्वेक्षणानुसार, देशात ६ कोटींहून अधिक ड्रग्ज वापरणारे आहेत. ज्यामध्ये मोठ्या संख्येने वापरकर्ते १०-१७ वयोगटातील आहेत.



डॉ. प्रितम भि. गेडाम
मो. ०८२३७४ १७०४१

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या नॅशनल ड्रग डिपेंडन्स ट्रीटमेंट सेंटरने शालेय विद्यार्थ्यांमधील अंमली पदार्थांच्या गैरवापरावर केलेल्या अभ्यासादरम्यान असे आढळून आले की, सर्वेक्षण केलेल्या १४ पैकी १ विद्यार्थ्यांनी गेल्या महिन्यात कोणत्यातरी अंमली पदार्थ वापरले होते. हे सर्वेक्षण मे २०१९-जून २०२० दरम्यान इयत्ता ८-१२ च्या सुमारे ६००० शालेय विद्यार्थ्यांवर करण्यात आले. सर्वेक्षणात असे आढळून आले की १०% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी मादक द्रव्यांचे सेवन (इनहेलेंट्स, कॅनॅबिस, ओपिओइड्सपासून ते अल्कोहोल आणि तंबाखूपर्यंत) केले होते. वर्षनिहाय विश्लेषणात असे दिसून आले की ४% तंबाखू वापरतात, त्यानंतर अल्कोहोल ३.८%, ओपिओइड्स २.८% (अफु, हेरॉइन आणि फार्मास्युटिकल ओपिओइड्स), कैनबिस (भांग, चरस आणि गांजा) २% आणि १.९% टक्के विद्यार्थ्यांनी इनहेलेंट्स चा नशा केला. इंडियन जर्नल ऑफ सायकियाट्रीने मेटा-विश्लेषणात म्हटले आहे की, शालेय विद्यार्थ्यांमध्ये मादक पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण १८% इतके जास्त आहे. गेल्या आठ वर्षांत भारतात अंमली पदार्थांचा वापर ७० टक्क्यांनी वाढला असून, देशात सुमारे १०० दशलक्ष व्यसनी आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्यानुसार, भारतातील १३ टक्के ड्रग्ज व्यसनी हे २० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. देशाच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने शेवटच्या अहवालात अंमली पदार्थांच्या अंदाजे वापराची आकडेवारी जाहीर केली आहे, त्यात असे दिसून आले की ३१ दशलक्ष गांजाचे वापरकर्ते होते, २४ दशलक्ष ओपिओइड वापरकर्ते आणि ७.७ दशलक्ष इनहेलर वापरत होते. २०४७ पर्यंत भारताला 'अंमली पदार्थ मुक्त' करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

आजच्या आधुनिक युगात मुलं खूप सक्रिय आणि महत्त्वाकांक्षी दिसतात. मुलांना लवकरात लवकर स्वतंत्र आणि स्वावलंबी व्हायचे असते. आधुनिकता आणि इंटरनेटमुळे मुले खूप लवकर मोठी झालेली दिसतात. बहुतेक पालक असेही म्हणतात की त्यांची मुले खूप हुशार आणि होनहार आहेत. सर्व पालकांना त्यांच्या मुलांचा अभिमान आहे, ही चांगली गोष्ट आहे, परंतु आजच्या काळात पालकांनी मुलांच्या चांगल्या-वाईट सर्व कामांकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. मुलांमध्ये नशेच्या वाढत्या प्रमाणाला सर्वात मोठे दोषी पालक आहेत, जर वेळीच मुलांना योग्य मार्गदर्शन आणि सोयीस्कर संगोपण मिळाले असते तर इतकी वाईट परिस्थिती उद्भवली नसती. मुलांची दैनंदिन दिनचर्या, त्यांचे मित्र, वर्गमित्र, मुले कोणाला भेटतात, कुठे येतात-जातात, त्यांचा वेळ कुठे आणि किती घालवतात हे पालकांनी जाणून घेतले पाहिजे. मुलांचे पालकांशी खोटे बोलणे आणि बेकायदेशीर कृत्यांमध्ये गुंतण्याचे प्रमाण आजकाल खूप वाढले आहे. अंमली पदार्थांकडे वाटचाल करणारी तरुण पिढी समाजासाठी शाप ठरली आहे. या वयात मुलांना अधिक हाताळणीची आवश्यकता असते. पालकांचा व्यस्ततेचा बहाणा आणि मुलांवरचा त्यांचा आंधळा विश्वास मुलांच्या येणाऱ्या उज्वल भविष्याला उद्ध्वस्ततेकडे वळवतो.

मुलांना बोलण्यात किंवा वागण्यात कसलाही संकोच वाटू नये म्हणून पालकांनी मुलांना मित्रासारखे वागवावे. मुलांसोबत वेळ घालवावा, मुलांचे वर्तन त्यांच्या जिज्ञासा आणि स्वभावानुसार समजून घेणे, खोटा देखावा टाळावा, मुलांसोबत पालकांनी जीवनातील चांगल्या-वाईट गोष्टी, अनुभव शेअर करावें. मुलांसमोर कधीही अयोग्य वागू नका. पालकांनी मुलांसमोर नशा करणे ही लज्जास्पद बाब आहे. नशा कोणीही कधीही कोणत्याही वयात कधीच करू नये, नशेमुळे फक्त नुकसानच होते. आजची मुले ही उद्याच्या देशाचे उज्वल भविष्य आहेत, आजची तरुण पिढी ड्रग्जच्या आहारी जात आहे, त्यांना अंमली पदार्थांपासून वाचवण्याची जबाबदारी पालकांची आहे. आपली जबाबदारी चोखपणे पार पाडणे हे पालकांचे परम कर्तव्य आहे. देश अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी पालकांबरोबरच शिक्षक, समाज आणि सरकारची जबाबदारीही खूप महत्त्वाची आहे. नशा मुक्त होऊन आनंदी आयुष्य जगूया आणि सशक्त देश घडवूया. जर तुम्ही किंवा कुटुंबातील कोणताही सदस्य अमली पदार्थांच्या गैरवापराचा बळी असेल, तर तुम्ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने स्थापन केलेल्या नशा मुक्त भारत अभियानाच्या राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक १४४४६ द्वारे मदत घेऊ शकता.

# भारताची उल्लेखनीय मोबाइल फोन गाथा!

गेल्या ९ वर्षांत भारताने इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात लक्षणीय प्रगती केली असून त्यामध्ये २०२२-२३ मध्ये (औद्योगिक अंदाजांनुसार) जवळपास तिप्पट वाढ होऊन ती १०१ अब्ज डॉलर झाली आहे, निर्यातीमध्ये चौपट वाढ होऊन ती २३ अब्ज डॉलर पर्यंत पोहोचली आहे आणि मूल्यवर्धनात सुमारे २३ टक्के इतकी वाढ झाली आहे. जागतिक इलेक्ट्रॉनिक उत्पादनामध्ये २०१२ मधील १.३ टक्क्यांवरून २०२१-२२ मध्ये ३.७५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. इलेक्ट्रॉनिक्ससाठी पीएलआय योजना सुरू केल्यानंतर भारताचा जगात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाइल उत्पादक म्हणून उदयाला आला आहे. २०१४-१५ मध्ये ६० दशलक्ष मोबाइल फोनचे उत्पादन होत होते. ते २०२१-२२ मध्ये ३२० दशलक्ष मोबाइल फोन इतके झाले आणि २०१४ मध्ये जागतिक मोबाइल हँडसेटपैकी केवळ ३ टक्के मोबाइल भारतात तयार होत होते. त्यांचे प्रमाण या वर्षात १९ टक्के होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. मूल्याच्या दृष्टीने मोबाइल फोनच्या उत्पादनात २०१४-१५ मधील १९० अब्जांवरून २०२२-२३मध्ये ३.५ ट्रिलियन इतकी वाढ




झाली आहे. एकूण १०१ अब्ज डॉलरच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनात स्मार्टफोनचा वाटा ४४ अब्ज डॉलर इतका आहे त्यापैकी ११.१ अब्ज डॉलरची निर्यात करण्यात आली आहे. मोबाइल फोनच्या उत्पादनाची मूळे भारतात खोलवर जात असून ती विस्तारत देखील असल्याचे पुरेसे दाखले यामधून मिळत आहेत, ज्यामध्ये देशांतर्गत मूल्यवर्धन, रोजगार आणि उत्पन्न समाविष्ट आहे. एलएसईएमसाठी पीएलआय योजनेने २०२२-२३ या आर्थिक वर्षात ६५.६२ अब्ज डॉलरची गुंतवणूक आकर्षित केली आहे, ज्यामुळे २.८४ ट्रिलियन रुपयांचे उत्पादन झाले आहे. यात १.२९ ट्रिलियन रुपयांच्या निर्यातीचा देखील समावेश आहे आणि एक लाखपेक्षा जास्त थेट रोजगार आणि अडीच लाखपेक्षा जास्त अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती झाली आहे. नव्याने तयार झालेल्या सर्व रोजगारांमध्ये महिलांच्या रोजगाराचे प्रमाण ३० टक्के आहे. ज्यामुळे भारतातील औपचारिक विभाग रोजगारात लिंगसमानता निर्माण होऊ शकेल. २०१४पासून दहा लाखांपेक्षा जास्त रोजगारांची या क्षेत्रात भर पडली आहे. भारतामध्ये आपल्या सर्वाधिक आधुनिक मॉडेल्ससहित आयफोन उत्पादनाचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्याचा निर्णय ॲपल कंपनीने घेतल्यामुळे या क्षेत्रातील भारताच्या प्रगतीला अधिक चालना मिळाली आहे. २०२५ पर्यंत ॲपलच्या आयफोनपैकी एक चतुर्थांश आयफोनचे उत्पादन भारतामध्ये होईल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. एकंदरच या सर्व बाबी विचारात घेतल्या, तर पीएलआय योजनेकडे रोजगार निर्मिती, उत्पादन क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीत वाढ, निर्यातीत वाढ आणि लक्षणीय मूल्यवर्धनाबरोबरच निर्यातीच्या प्रकारांमध्ये विविधता आणि अनेक पीएलआय उत्पादनांमध्ये विशेषतः वाढत्या स्थानिक मूल्य साखळ्यांच्या निर्मितीमध्ये वाढ यामध्ये दिलेल्या योगदानाच्या आधारे पाहिले गेले पाहिजे.

**- राजेश कुमार आणि कुमार प्रताप**

**(या लेखाचे दोन्ही लेखक भारत सरकारचे अनुक्रमे उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे सचिव आणि याच विभागाचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार आहेत.)**

## शब्दकोडे-१०३



आडवे शब्द

१. फूल नाही तर निदान ही तरी! ३. म्हातारपण व मृत्यू नसलेला ६. गायीची लेक १०. पंख ११. सारखे १२. मोत्याची माळ १३. सुस्ती १४. जीभ १५. देण्याचा स्वभाव असलेला १६. विष १८. खोटा, तात्पुरता राग इ. १९. पंगतीतील आसन २०. विडा रंगवणारा २१. शिखर, टोक २२. सह्याद्रीच्या घाटातील प्रसिद्ध पुष्पपठार २४. स्निग्ध औषध २५. मांडणी २६. तमाम, सर्व २७. आपला नसलेला २९. आपला नसलेला २९. झडती (हिंदी) ३०. एकलकोंडा ३२. राजाचे संबोधन ३३. चिंच, टोमॅटो इ.चे क्षुधावर्धक पेय ३४. स्वत:, स्वयं ३५. देवाचे देहधारी रूप ३६. आपल्या राष्ट्रगीताची सुरुवात ४०. एक सोनेरी धान्य ४२. चाट पडावे असे अजब ४४. एखाद्याच्या मागे ४५. पाषाण ४६. संमती ४८. मधुबालाने अजरामर केलेली भूमिका ५०. द्रव्य ५१. चिवचिवाट ५४. बूड ५६. च्या बद्दल ५८. एकाग्रचित्त ५९. ढास, कास ६१. सासू झालेली आत्याबाई ६२. सध्याचे युग ६३. बधीराजाचा जयघोष ६६. नरमांजर ६७. मत देणारा ७०. प्रजा, लोक ७२. हा सुवर्ण असल्यास दोन्ही बाजूंना न्याय देणारा ७३. लोकोत्तर पुरुष ७५. वटवट ७६. मुरंबा (इंग्रजी) ७७. आदित्यवार ७८. रात्रीचा राग

उभे शब्द

१. पातक २. जळलेला ३. कोणीतरी एक, परका ४. गोकुळातील लीला ५. मनाला आलेला थकवा ६. अवधी, समय ७. हावरटपणा ८. वाघाची ललकारी ९. अनाथ बालकांना सांभाळणारी संस्था ११. हबकारा (पाण्याचा) १३. आरोप १७. रसाळ, ताजे १९. द्रव धातू २१. न्यूनता २२. '----- -- अन् तिखट झाली' एक म्हण २३. गुन्हा २६. पूर्वीचा पैसा, घेऊन या! २८. मातीचा कण ३१. चंदन उगाळण्याचा दगड ३२. प्रगाढ संस्कृतपंडितांना दिली जाणारी एक उपाधी ३३. सावली ३४. आणि ३५. अकस्मात ३७. किल्ला ३८. कामदेवाचे आयुध ३९. वस्तू, पर्वत ४१. चुलता ४३. पुन्हा ४७. दागदागिने ४८. कैद ४९. वेदना, तिडीक ५२. विवाह ५३. संकल्पातील लक्ष संख्या ५५. मान खाली घातलेली ५७. तात्काळ, लगेच ६०. शरम ६१. खवा ६२. हात ६४. नवरा ६५. जन्म ६७. साधारण ६८. मुंबईतील एक उपनगर ६९. युद्ध ७१. गरज, अडचण ७२. मौज, धमाल ७४. उमर ७५. केवड्याचे, केळीचे रान

## शब्दकोडे १०२ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.नवागत ५.कौल ६.पावन ९.मरवा १०.वनचर १२.पवन १३.संगत १४.नास १५.कर १६.लवकर १८.भाक १९.पुलाव २०.सकटनिकट २२.घराणे २३.रमावर २५.रम २६.भाल २७.कसा २९.साल ३१.टप ३३.जर ३४.रमणी ३५.नयन ३६.मरणयातना ३८.रमा ४२.तेज ४३.मजल दरमजल ४६.मोहक ४८.कोदंड ४९.रस ५०.सह ५१.पल ५३.कबाड ५५.गावरान ५६.सड ५७.भेदरट ५९.सोय ६०.दावेदार ६२.मकरंद ६४.करडा ६६.तसनस ६८.डाक ६९.पात ७०.कडा ७२.गुलाब ७४.भाट ७५.मला ७६.राघव राजाराम ८०.भात ८१.अमर ८२.गळ ८३.नभांगण

**उभे उत्तर**

१.नमनाला घडाभर तेल २.वारस ३.गवा ४.मान ५.कौरव ६.पाव ७.वन ८.संततधार १०.वरवर ११.चलनवलन १२.परकर १३.संकट १५.कला १७.कस १८.भाकड १९.पुणेकर २१.टम टम २४.मासा २६.भारत २८.साम दाम दंड भेद ३०.होन ३२.परवा ३३.जयावह ३७.नाना ३९.माज ४०.काल ४१.आजतागायत ४३अ.जड ४४.दर ४५.रसद ४६.मोहनदास ४७.कप ४८.कोबा ५०.सरा ५२.लहर ५३.कडकडाट ५४.हरकत ५६.सम ५८.डर ६१.दाखला ६३.रंक ६५.डाकघर ६७.नखरा ६९.पाला ७१.डाव ७३.बटण ७४.भाग्य ७५.मत ७६.राम ७७.राग ७८.जाळ ७९.मन

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

### भुजबळ यांच्याकडून कामाचा आढावा

**नाशिक ।** येवला तालुक्यातील उत्तर पूर्व भागासाठी वरदान ठरणाऱ्या देवना साठवण तलाव व मेळाच्या बंधाऱ्याच्या कामाला गती देऊन काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा सूचना माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. काल नाशिक येथील कार्यालयात जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत छगन भुजबळ यांनी या कामांचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

### नांदगावला पावसाची हजेरी; बळीराजा सुखावला

**नांदगाव ।** पावसाने नांदगाव शहर व तालुक्यातील काही भागांत हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच तालुक्यातील अनेक ठिकाणी अद्यापही पावसाची प्रतिक्षा कायम आहे. तर आजच्या पावसामुळे शेतकऱ्यांना शेतात पेरण्या करण्यासाठी चाल मिळाली आहे.दरम्यान, हवामान विभागाकडून पुढील पाच दिवसांत राज्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात येत्या दोन ते तीन दिवसांत जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. तर नांदगाव तालुक्यात आज झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतिक्षा कायम आहे.

# पालापाचोळा घंटागाडी व्यवस्थापनासाठी हरित सत्याग्रह




**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील विविध पर्यावरण संस्था प्रतिनिधींद्वारे सुयोग्य पालापाचोळा घंटागाडी व्यवस्थापन करण्याबाबत नाशिक महापालिकेच्या गेट बाहेर हरित सत्याग्रह नुकताच करण्यात आला.

पालापाचोळा जाळल्यामुळे कार्बन मोनॉक्सइड व बेन्झोपायरीन सारख्या विषारी वायूंमुळे नागरिकांना विशेषतः लहान मुलांना श्वसनाचे आजार तसेच कँसर सारखे कधीही बरे न होणारे आजारही होवू शकतात. यासाठी न्यायालय व सरकारने पालापाचोळा जाळणाऱ्यांना ५००० ते २५००० रुपये दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश प्रशासनास दिलेले आहेत.

पालापाचोळा जाळून प्रदूषण न करता या नेसर्गिक संपत्तीचा पर्यावरण संवर्धनासाठी उपयोग करणे गरजेचे आहे. नागरिकांचे व पर्यावरणाच्या सुदृढ आरोग्यासाठी, धूरमुक्त प्रदूषणमुक्त शहर स्वच्छतेसाठी घनकचरा विभागाने घरोघरचा पालापाचोळा, नारळाच्या वाळलेल्या फांद्या संकलनासाठी ४० पालापाचोळा घंटागाड्यांची उपलब्धता केलेली आहे. या घंटागाड्यांच्या व्यवस्थापनाच्या पालापाचोळा संकलनाच्या चुकीच्या पद्धतीमुळे नेसर्गिक संपत्ती जाळली जावून प्रदूषण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पालापाचोळा घंटागाड्यांच्या योग्य व्यवस्थापनाने सहज टाळता येणारे हे प्रदूषण कायमस्वरूपी थांबवून प्रदूषणमुक्त स्वच्छतेसाठी शहरातील विविध संघटनातर्फे नाशिक महापालिकेसमोर पालापाचोळा घंटागाडी व्यवस्थापनासाठी हरित सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

नागरिकांनी कचरा रस्त्यावर फेकावा मग पालिकेच्या घंटागाड्यांनी तो उचलावा आपली स्वच्छतेची ही पद्धत आहे का? नक्कीच नाही, मग पालापाचोळा घंटागाड्यांचे सुयोग्य व्यवस्थापन का नाही? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते यांनी केला आहे. नागरिकांच्या पैशातून नाशिक शहरात ४० पालापाचोळा घंटागाड्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या पालापाचोळा घंटागाडयांचे योग्य व्यवस्थापन केले जावे यासाठी पर्यावरण प्रेमी संघटना अनेक वर्षांपासून पाठपुरावा करीत आहोत. आजच्या पालिकेच्या पालापाचोळा संकलन व्यवस्थेत नागरिकांना पालिका पालापाचोळा रस्त्यावर फेकावयास भाग पाडून घंटागाडी कर्मचाऱ्यांना मोठ्या कसरतीने तो उचलावयास भाग पडत आहे. पालिकेच्या या संकलन पद्धतीमुळे शहरातील रस्तेकिनारी पालापाचोळा, नारळाच्या वाळलेल्या फांद्यांनी व त्यावर नागरिक प्लास्टिकचा कचरा टाकत असल्याने शहर, रस्ते अस्वछ होत आहेत. या पद्धतीमुळे अनेक वेळा नागरिकांकडून नाइलाजास्तव पालापाचोळा जाळला जावून या विनाशकारी प्रदूषणास, नागरिकांच्या विशेषतः लहान मुलांच्या आरोग्य विषयक समस्यांसाठी पालिकेचे व्यवस्थापनच कारणीभूत ठरत आहे.

अस्वच्छतेस प्रोत्साहन देणारी ही पद्धत बंद करण्याची रास्त मागणी तथा विनंती आयुक्तांनी अनेक वेळा मान्य करूनही घनकचरा विभाग या आदेशाची अंमलबजावणी करीत नसल्याने शहराचा स्वच्छतेतील क्रमांक ढासळत असून नागरिक स्वतःहून स्वच्छता सर्वेक्षणात सहभाग नोंदवित नाहीत हे शहराचे दुर्देवच म्हणावे लागेल. सरकारच्या स्वछ भारत अभियानात जनता फक्त झाडू घेवून फोटो सेशनला रस्त्यावर येईल हा अधिकाऱ्यांचा गैरसमज असून सजग नाशिककर शहर स्वच्छतेत कुठलीही तडजोड सहन करणार नाहीत अशी पर्यावरण प्रेमींची भूमिका आहे. नागरिकांच्या स्वच्छता व्यवस्थापनाबाबतच्या सततच्या पाठपुराव्यातून खऱ्या अर्थाने शहर स्वच्छतेत पालिकेला मदत होत असून योग्य व्यवस्थापनामुळे कर्मचाऱ्यांचे श्रम कमी होत आहेत. धूरमुक्त स्वछतेसाठी पालापाचोळा घंटागाड्यांचे नियोजन महत्वपूर्ण ठरणार असून शहर स्वछतेसाठी ते नक्कीच दिशा दर्शक ठरेल असे पर्यावरण प्रेमींचे म्हणणे आहे.

या हरित सत्याग्रहाची मनपा आयुक्तांनी दखल घेवून २ दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन विविध पर्यावरण संस्था प्रतिनिधींना दिले. यावेळी डॉ संदीप भानोसे, जगबीर सिंग, अरविंद निकुंभ, नेहाल पाटील, भारती जाधव, निशिकांत पगारे, नितीन रेवगडे, मनीष बाविस्कर, बर्वे व इतर संस्था प्रतिनिधी उपस्थित होते.

# यशासाठी आत्मविश्वास, चिकाटीची गरज: कुलकर्णी



### रुद्रा महिला संस्थेतर्फे खांडबहाले,काशीद सन्मानित

**नाशिक । प्रतिनिधी**

मातोश्री गि.दे. पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनी बालवैज्ञानिक क्रितिका खांडबहाले व ऋतुजा काशीद यांनी हायब्रीड रॉकेट बनवून चेन्नई येथील पट्टीपलम् येथून अवकाशामध्ये यशस्वीरित्या सोडल्याबद्दल रुद्रा महिला सेवाभावी संस्थेच्या संस्थापिका कविता कुलकर्णी यांनी शाल, श्रीफळ देत त्यांचा सत्कार केला.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल मिशन-२०२३ साठी विद्यालयाच्या बालवैज्ञानिक क्रितिका खांडबहाले व ऋतुजा काशीद या मुलींनी 'पिको सॅटेलाइट' प्रत्यक्षरीत्या बनविले आणि ते हायब्रीड रॉकेट तामिळनाडू राज्यातील चेन्नई येथील पट्टीपलम येथून अवकाशामध्ये यशस्वीरित्या सोडण्यात आले. या उपक्रमाची नोंद 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नोंद घेण्यात आली आहे. ग्रामीण भागातील मुलींनी घेतलेली गगन भरारी म्हणून रुद्र महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापिक अध्यक्षा कविता कुलकर्णी, सचिव हर्षल कुलकर्णी, सदस्य मीरा आवारे, कविता पाटील, वैशाली खाचणे, सविता टर्ले यांनी शाळेत येऊन या बाल वैज्ञानिकांचे कौतुक केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे व मार्गदर्शन करणारे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी यावेळी कविता कुलकर्णी यांनी बालवैज्ञानिक मुलींनी मिळविलेले यश अतिशय कौतुकास्पद आहेत. या मुलींमुळे शाळा, गाव, जिल्हा तसेच राज्याचा नावलौकिक वाढवला आहेत. असा आत्मविश्वास, चिकाटी ठेवून सर्वच विद्यार्थ्यांनी यश मिळवले पाहिजेत असे आवाहन केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे यांनी रुद्रा महिला संस्थेने विद्यालयातील बालवैज्ञानिकांच्या केलेल्या सत्काराबद्दल धन्यवाद व्यक्त करत रुद्रा महिला संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी स्वागत व प्रास्ताविक बाळासाहेब सोनवणे आणि आभार प्रदर्शन सुरेखा भामरे यांनी केले.

याप्रसंगी विद्यालयातील संजय पवार, देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, सुरेखा भामरे, अश्विनी चौरे, दिपाली वाडीले, खंडू लांबे, दिलीप खांडबहाले, अरुण शिरसाठ, विलास येवले यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाज-ए-वतन तर्फे गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**लासलगाव । समीर पठाण**

नाज-ए-वतन बहूउद्देशीय सामाजिक संस्थेमार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणारा गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्ववान महिलांचा गुण गौरव सोहळा लासलगाव ग्रामपंचायत हॉल,कॉलेज रोड येथे उत्साहात संपन्न झाला.सर्व समाजातील ७५ गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच २० कर्तृत्वान महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गुण गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लासलगाव ग्रामपंचायतचे सरपंच तसेच लासलगाव व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे करियर काऊन्सलर व मोटिवेशनल स्पीकर आसिफ शेख उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना दहावी व बारावी नंतर करिअरच्या विविध संधी व व्यक्तिमत्व विकास या विषयांवर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.योग्य वेळी योग्य करियरची निवड करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

नाज-ए-वतन संसथेच्या संस्थापक अफजल शेख,अध्यक्षा फरीदा काजी यांनी सदर कार्यक्रम हा गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्ववान उद्योजक महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आल्याचे सांगितले.दक्षता समितीच्या अध्यक्षा वेदिका होळकर यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या व मोफत प्रशिक्षणची माहिती दिली.

या प्रसंगी उपसरपंच रामभाऊ शेजवळ,लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालिका सोनिया होळकर,कॉंग्रेस प्रवक्ता गुणवंत होळकर,ग्रामपंचायत सदस्य रेवती होळकर,अमिता ब्रम्हेचा,डॉ.संगीता सुरशे,डॉ.उषा बनसोडे,उषा पवार,माजी उपसरपंच अफझल शेख,माजी सरपंच संगीता शेजवळ,सागर निकाळे,उगाव सरपंच तय्यब शेख,मुस्लिम उत्कर्ष समितीचे अध्यक्ष ग्रामीण सादिक पठाण,सरपंच पिंपळगाव नजीक सीमा दरेकर,पत्रकार समीर पठाण,पत्रकार आसिफ पठाण,नॅशनल उर्दू हायस्कूलचे क्लर्क मुजीब शेख,कैलास उपाध्ये,शिवसेनेच्या निलोफर शेख,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे इस्माईल मोमीन,मिरान पठाण,नाज ए वतन निफाड समन्वयक जावेद शेख,मन्सुरी समाज चे अध्यक्ष तौसिफ़ मन्सुरी,दीपक भालेराव उपस्थित होते.

जिजाऊ व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण अंतर्गत मुली व महिलांना अरुणा पवार,सविता गांगुर्डे,प्रियंका चौथानी, फरीदा काजी या अनुभवी प्रशिक्षकांमार्फत विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विकास चांदर,आयेशा काजी व अर्चना परदेशी यांनी केले. नाज-ए-वतन बहूउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा फरिदा काजी यांनी सर्वांचे आभार मानले.

# प्रभाग क्रमांक ७ मधील विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न



**नाशिक । प्रतिनिधी**

शिवसेना वर्धापदिनानिमित्त सुरू असलेल्या 'भगवा महिना' अंतर्गत काल प्रभाग क्रमांक ७ चे माजी नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्या बालगणेश फाऊंडेशनच्या वतीने प्रभागातील १० वी व १२ उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ शिक्षण अभ्यासक सचिन उषा विलास जोशी हे इस्पॅलिअर एक्सपेरिमेंटल स्कूल आणि इस्पॅलिअर हेरिटेज स्कूलचे फाउंडर डायरेक्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी शिवसेना महानगर प्रमुख प्रविण तिदमे, योगेश बेलदार, रोशन शिंदे, आनंद फरताळे, शुभम पाटील, सनी पगार, आकाश कोकाटे, प्रसन्ना तांबट, कल्पना धटिंगण, कैलास लोणे, प्रशांत आहेर, हेमंत दळवी, दिपक हांडगे, संजय घोडके, साईदास पाटील, आबा गोवर्धने, हेमंत शिंदे, हर्षल पाटील, प्रसाद बागुल, समीर देवघरे, कुणाल पोतदार आदी उपस्थित होते. १० व १२ हा विद्यार्थी जीवनातील एक महत्त्वाचा शैक्षणिक टप्पा आहे. यानंतरच विद्यार्थ्यांच्या खऱ्या अर्थाने सुरुवात होते. अशा वेळेस विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनिवडी आपल्या पालकांकडे व्यक्त करणे आवश्यक आहे. पालकांनी देखील आपल्या मुलांच्या आवडी नुसार, इच्छेनुसार कल पाहून पुढील शैक्षणिक वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहीत केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रम न निवडा, नवनवीन अभ्यासक्रम निवडून पर्यावरणाशी संबंधित व गुगल वर टॉप १० प्रॉब्लेम इन द वर्ड सर्च करून त्यावर आधारित अभ्यासक्रम निवडून करियर करावे असे सचिन जोशी सर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना आवाहन केलं. प्रभाग क्रमांक ७ हा नुकताच नाशिक शहरात क्वालिटी वॉर्ड म्हणून घोषित करण्यात आला. यातील १० व १२ उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मार्क हे देखील क्वालिटी असल्याचे प्रभागाचे माजी नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी सांगितले. या प्रसंगी ऊर्जा युवा प्रतिष्ठान रक्षा प्रकल्प अंतर्गत एकेरी पालक असलेल्या रिद्धी व सिद्धी या दोन्ही मुलींना तसेच प्रभगतील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या परंतु शिक्षणाची जिद्द असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक पुस्तके, स्कूल बॅग, साहित्य, गणवेश, शूज देण्यात आले.

# गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा : चेतना सेवक

### राधिका फाउंडेशनचे कार्य हीच आमची ओळख

**नाशिक । प्रतिनिधी**

शिक्षण ही जन्माची शिदोरी असते, ज्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर हा अतिशय खालावलेला आहे. अशी झोपडपट्टीतील मुले शिकली पाहिजेत, त्यांना शिक्षण मिळाले तरच त्यांची प्रगती होईल, रस्त्यावर राहणारे निराधार, गरीब मुले ज्यांना घर नाही, ज्यांना खायला नाही अशा मुलांना शिकता यावे म्हणून आमच्या राधिका फाउंडेशन ग्रुपकडून एका वाहनाची सोय केली आहे. त्या वाहनातून या मुलांना शाळेत आणून शिक्षण घेण्यासाठी बसवले जाते आणि परत शाळा सुटल्यावर सोडून दिले जाईल.



अशी माहिती राधिका फाउंडेशनच्या संस्थापिका चेतना सेवक यांनी दिली.

आडगाव नाका येथील श्रीराम शाळेत गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर मानवाधिकार संघटनेच्या आशा पाटील, लाला ठक्कर, राधिका फाउंडेशनच्या जिल्हा अध्यक्षा कल्पना सोनार, खजिनदार राणी कासार, सदस्य विकी कुटे, उमा परदेशी, प्रियंका कानडे, शेपाली शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी लाला ठक्कर यांनी आपल्या मनोगतामध्ये येथे बरेच अशी मुले आहेत की, ज्यांना स्वतः चे घर नाही, रस्त्यावर राहतात अशा मुलांना शिक्षणासाठी पाहिजे ती मदत त्यांना शिक्षणासाठी करायला आम्ही तयार आहोत असे आश्वासन दिले. यावेळी मानवाधिकार संघटनेच्या आशा पाटील यांनी आपल्या मनोगतात राधिका फाउंडेशन हे दुर्गम भागात जाऊन वाड्या-पाड्यावरील मुलांनाही शिक्षणासाठी प्रोत्साहित करत शैक्षणिक साहित्याची मदत करत असतात. राधिका फाउंडेशनचे कार्य अतिशय स्तुत्य असल्याचे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक डावरे यांनी केले. यावेळी श्रीराम विद्यालयातील तसेच स्वामीनारायण येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना राधिका फाउंडेशनच्यावतीने वह्या, पेन, पेन्सिलचे वाटप केले. यामुळे राधिका फाउंडेशनच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भाजप दिव्यांग विकास आघाडीचे डॉ. मुखर्जी यांना अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**

देशाच्या ऐक्यासाठी स्वतः च्या प्राणाची आहुती देणारे थोर देशभक्त, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुख़र्जी यांच्या बलिदान दिनानिमित्ताने दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे यांनी स्वामी विवेकानंदनगर येथे अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.



या कार्यक्रमास माजी नगरसेविका छाया देवांग, बाळासाहेब घुगे, राजेंद्र जडे यांनी डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनात घडलेल्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याचे स्मरण करून आदरांजली वाहिली. यावेळी दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे, माजी नगरसेविका छायाताई देवांग, सिडको मंडल अध्यक्ष अर्चना दिंडोरकर, सुरेखा लिंगायत, कविता सोनार, मंडल पदाधिकारी प्रकाश चकोर, राजेंद्र जडे, रविंद्र पाटील, राहुल गणोरे, विलास सानप, उत्तम काळे, दिलीप देवांग व प्रभागातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार बाळासाहेब घुगे यांनी मानले.

## न्यूज कॉलम

### भरधाव ट्रकची दुचाकीसह कारला धडक

मालेगाव । मुंबई-आग्रा महामार्गावरील चंदनपुरी शिवारात भरधाव ट्रकने पुढे जात असलेल्या दुचाकीसह इनोव्हा कारला धडक दिल्याने भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीस्वार तरुण जागीच ठार झाला असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.याबाबत अधिक माहिती अशी की, महामार्गावर मालवाहू ट्रकने पुढे जात असलेल्या दुचाकी क्रमांक (एम. एच. ४१ ए.वाय. ३६७३) ला धडक दिल्याने दुचाकी (इळज्ञश)फेकली गेल्याने दुचाकीस्वार इमरान सय्यद आबिद (वय ३०) रा. मदनीनगर हा गंभीररित्या जखमी होऊन जागीच ठार झाला. तर त्याचा साथीदार शेख बशीर शेख रहीमुद्दीन हा गंभीर जखमी झाला आहे.

### रेल्वेतून पडून युवकाचा मृत्यू

**इगतपुरी ।** इगतपुरी रेल्वे स्थानकावर चालती एक्स्प्रेस पकडण्याच्या नादात एका प्रवाशाचा तोल गेल्याने रेल्वे ट्रॅकवर पडून गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या युवकाची उंची ५ फूट ५ इंच, रंगाने गोरा, बारीक काळी मिशी, घारे डोळे, अंगात काळ्या रंगाची फूल पँट, फूल बाह्यांचा हिरव्या रंगाचा शर्ट घातलेला असे वर्णन आहे.या युवकाबाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा अन्य नातेवाईकांची माहिती समजल्यास इगतपुरी लोहमार्ग पोलीस ठाण्यात अथवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

# रोहिणी, मृग गेले कोरडे आता आर्द्रा नक्षत्रावर पेरणीची आशा

**धुळे । प्रतिनिधी**



तालुक्यातील सर्वच ठिकाणी बळीराजाला पावसाची ओढ लागल्याने खरीप हंगामातील मशागतीच्या कामे पूर्ण झाली आहे. यंदा जून महिना संपत आला तरी पावसाने अद्यापही तालुक्यात हजेरी लावलेली नाही. तालुक्यातील शेतकरी पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत आहे. मृग नक्षत्राचा पाऊस तालुक्यात नेहमीच जोरदार हजेरी लावत असतो. परंतु हे नक्षत्र सुरू होऊनही महिना संपत आला तरी पाऊस पडण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे बळीराजाच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. मागील वर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला दमदार पावसाने तालुक्यात हजेरी लावली होती. त्यामुळे तालुक्यातील खरीप हंगामाला बळीराजाने जोरदार सुरुवात केली होती. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेती हंगामाला जोर आला होता.

गेल्यावर्षी मोठा खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात बळीराजाला पावला होता; परंतु यंदा जून महिना संपत आल्याने पावसाने अद्यापही हजेरी लावली नसल्याने बळीराजा चिंतेत दिसत आहे. बळीराजासमोर आर्थिक संकट उभे असल्याचे दिसत आहे. सध्या तरी तालुक्यातील सर्वच ठिकाणी खरीप पेरणीची जोरदार सुरुवात दिसून येत आहे. परंतु जून महिना संपत आला असून पावसाने हजेरी न लावल्याने खरीप हंगामावर अस्मानी संकट उभे ठाकले आहे. पावसाबाबत हवामान विभागाच्या महत्त्वाच्या सूचना गेल्या काही दिवसांपासून बळीराजा बघत आहे. जून महिना संपत आला तरी पावसाने महाराष्ट्रात किंवा तालुक्यात हजेरी न लावल्याने बळीराजा हतबल झाला आहे. जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची कामे सुरू केली आहेत. परंतू पाऊस पडत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. पाऊस नसल्याने शेतामध्ये पेरलेले बियाणे तसेच बारीक आलेली रोपे खराब होण्याची भिती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. रोवणी नक्षत्रात चार- दोन सरी कोसळल्यानंतर शेतकरी पेरणीपूर्व मशागत आटोपतो. मृग नक्षत्रात पावसाचा जोर वाढल्यानंतर पेरणीला वेग येते. सिंचनाची सोय असलेले शेतकरी पहिल्या आठवड्यात तर दुसऱ्या आठवड्यात कोरडवाहू शेतकरी पेरणीला सुरुवात करतात. दरवर्षी जून महिन्याच्या शेवटीपर्यंत पेरण्या पूर्ण होतात. मृग नक्षत्रात याची सुरुवात होते. पावसाच्या नक्षत्रांत हत्ती वाहन असल्यास दमदार पाऊस होत असल्याचे जुने जाणकार सांगतात. यंदाच्या मृग नक्षत्रात हत्ती वाहन असल्याने अनेक शेतकऱ्यांनी धूळपेरण्या केल्या. मे आणि जून महिन्याच्या प्रारंभीच बियाणे आणि खतांची खरेदी आटोपली. पण, गुजरातमध्ये धडकलेल्या बिपजॉय वादळामुळे वातावरण बदलून संपूर्ण मृग नक्षत्र कोरडा गेला.

# पंचवटीत सामूहिक योग साधना उत्साहात



**नाशिक । प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त पंचवटीतील मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे सामूहिक योग साधना संपन्न झाली. नाशिक शहरातील तीनही विधानसभा क्षेत्रात सामूहिक योग साधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.पंचवटीतील मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे १३०० पेक्षा अधिक योग साधकांनी सामूहिक योग सराव केला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी साडे सहा वाजता संगीतमय योगा पासून झाली. यानंतर योग दिंडी काढण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व ओमकार साधना करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी योग शिक्षक शशांक ईखनकर यांनी योग गीत सादर केले. योग शिक्षकांनी आयुष प्रोटोकॉल प्रमाणे योग सराव करून घेतला. प्राणायामानंतर प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेतील वासंती दीदी व पुष्पा दीदी यांनी राजयोग मेडिटेशन घेतले.

यावेळी व्यासपीठावर भाजपाचे शहर अध्यक्ष गिरीश पालवे, आ. राहुल ढिकले, कर्नल तरुण खन्ना, क्रीडा विभागाच्या उपसंचालिका सुनंदा पाटील, माजी महापौर रंजना भानसी आदी उपस्थित होते. याप्रसंगी योग शिक्षक प्रा.पिराजी नरवाडे, रमेश धस, प्रतिभा धस, साईनाथ झेंडे, सुनिता झेंडे, प्रसाद कुलकर्णी, अश्विनी येवला, वंदना कोरडे, बबनराव ढगे, जयश्री गावित, स्मिता शिंदे, सुवर्णा गुजर, रेखा कोठावदे, सुमन वाघ, दीपा शिंदे, अंजली अंधृटकर आदी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

या सामूहिक योग साधना कार्यक्रमात पतंजली योग संस्था, महाराष्ट्र योग शिक्षक संघ, प्रजापिता ब्रह्मकुमारी, भारतीय योग संस्थान, क्रीडा व युवक सेवा संस्था, एनसीसी विद्यार्थी या सर्व संस्था सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भाजपा योग प्रकोष्टच्या संयोजिका डॉ. प्रीती त्रिवेदी, भाजपा शहर सरचिटणीस सुनील केदार, युवा मोर्चा शहराध्यक्ष अमित घुगे, क्रिडा अधिकारी अरविंद चौधरी आदींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी चंद्रशेखर पंचाक्षरी, ज्ञानेश्वर काकड, संतोष नेरे, रुचि कुंभारकर, धनंजय माने, शाम पिंपरकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन रवींद्र माळुंजकर यांनी तर आभार प्रदर्शन व शांतीपाठ डॉ.प्रीती त्रिवेदी यांनी सादर केले.

# हस्ती स्कूल एन. सी. सी. छात्रसैनिकांचे 'ए' सर्टिफिकेट परीक्षेत घवघवीत यश

**दोंडाईचा ।** हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा येथील ४९ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. ज्यु. विंगचे २३ छात्रसैनिक एन. सी. सी. च्या ' ए ' सर्टिफिकेट परीक्षेस प्रविष्ट झाले होते. सदरची परीक्षा माहे जानेवारी २०२३ मध्ये नंदुरबार येथे संपन्न झाली होती. तिचा निकाल नुकताच जाहिर झाला असून; त्यात हस्ती स्कूल छात्रसैनिकांनी घवघवीत यश प्राप्त केले.

यात पुढील छात्रसैनिकांनी ' ए ' श्रेणी प्राप्त केली. प्रतिक्षा पाटिल, प्राची छाबडीया, तनुश्री सिसोदिया, योगिनी सिसोदिया, भाविका पाटिल, हर्षदा कोळी, दिशा पाटिल, रुणाल पगारे, यश तांबोळी, दुर्वेश शिंत्रे, रणवीर गिरासे, पुष्कर झवेरी, केशव महाजन, लक्ष राजपूत, अंकित ठाकरे, तिलक चित्ते, चेतन धनगर, प्रज्ञेश शिंदे, भावेश शिरसाठ, हर्ष धामणे, दिवेश तिरमले, विनय चौधरी; तर ज्ञानराज भामरे या छात्रसैनिकाने ' बी ' श्रेणी मिळविली आहे. वरील सर्व यशस्वी छात्रसैनिकांना हस्ती स्कूल फिजीकल इन्स्ट्रक्टर छोटू कोळी, सी.टी. ऑफिसर नरेश सावंत, सी. टी. ऑफिसर पुष्पा साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. तर हस्ती स्कूल शालेय समिती चेअरमन कैलास जैन, निवृत्त प्रा. मेजर दिलीप वाघेला तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम यांनी यशस्वी छात्रसैनिकांचे कौतुक केले.



# माजी सरपंच पांडुरंग माळी यांचा उपक्रम



**चिमठाणे । प्रतिनिधी**

> **अपघातातून जीवनदान मिळाल्यामुळे पुढील बोनस आयुष्य हे भगवंताच्या सेवेसाठी तसेच आपल्याकडून गावातील भाविकांना चारधाम यात्रा व पंढरीच्या विठुरायाचे दर्शन व्हावे या दृष्टीकोनातून गावातील भाविकांना दरवर्षी घेऊन त्यांना दर्शन करून घेणे याचातच खरा आनंद मिळतो. - पांडुरंग माळी, भडणे माजी सरपंच**

भडने गाव नेहमी धार्मिक क्षेत्रात अग्रेसर आहे. येथील भाविक आषाढी एकादशीला पंढरपूर जाऊन आपली वारी नियमितपणे करीत असुन आपली परंपरा अखंडपणे सुरु ठेवली आहे.

भडणे येथील माजी सरपंच पांडुरंग माळी यांना मागील दहा वर्षापासून एका अपघातात जीवनदान मिळाल्यामुळे त्यामुळे ते धामीक कामासाठी धावून जातात. दरवर्षी ते ह भ प गोविंद महाराज वरसाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तसेच चार धाम यात्रेसाठी नेहमी गावातील भाविकांना घेऊन जातात तसेच यावर्षी गावातील ज्येष्ठ पुरुष महिला यांना सोबत घेऊन भडणे ते पंढरपूर शिंदखेडा आगाराची स्वतंत्र बस भडणे येथुन पंढरपूर कडे ५० प्रवाशांना घेऊन मार्गस्थ झाली. बसला माजी सरपंच पांडुरंग माळी यांनी भगवा ध्वज बांधुन पुजा केली. वाहक व चालक यांना शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी गावातील ज्येष्ठ हभप नथसिंग गिरासे यांच्या हस्ते बसचे पूजन करून नारळ फोडण्यात आले. यावेळी माजी सरपंच पांडुरंग माळी, माजी चेअरमन यशवंत पाटील, ह भ प कथेसिंग गिरासे, माजी उपसरपंच जगतसिंगी गिरासे, पिंटू वाघ, समता परिषद जिल्हा अध्यक्ष योगेश माळी, संजय पाटील, प्रवीण निकम, बापु कुलकर्णी, डॉ आर आर पाटील, पोलीस पाटील युवराज माळी, विशाल माळी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पंढरपूर येथील यात्रेतील तीन दिवस मुक्काम ह भ प मठाधिपती गोविंद महाराज वरसाडेकर यांचे मठात व्यवस्था करण्यात येते. तीन दिवस कीर्तन प्रवचन व अन्नदानाचा कार्यक्रम या ठिकाणी आयोजित करून तेथे या भाविकांना राहण्यासाठी सोय केली आहे.

# बूंदी राजघराण्याचे वंशज वंशवर्धन सिंह चौहान यांचे स्वागत



### क्षत्रिय समाज फाउंडेशन पदाधिकाऱ्यांशी चर्चा

**नाशिक । प्रतिनिधी**

राजस्थान येथील बूंदी राजघराण्याचे २६ वे वंशज वंशवर्धन सिंह चौहान यांचे नाशिक येथे आगमन झाल्यानंतर क्षत्रिय समाज फाउंडेशनच्या वतीने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरम्यान महाराजा वंशवर्धन सिंह चौहान यांनी नाशिक दौऱ्यात क्षत्रिय समाज फाउंडेशनच्या कामकाजाबाबत माहिती घेतली. यावेळी क्षत्रिय समाज फाउंडेशनचे संस्थापक तेजपाल सिंह सोढा यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले. यावेळी क्षत्रिय समाज फाउंडेशनचे वरिष्ठ रंजितसिंह चुंडावत, वरिष्ठ तेजपाल सिंह शेखावत, उपाध्यक्ष विनोद सिंह शेखावत, सचिव सरवन सिंह शेखावत, पुष्पाल सिंह चुंडावत, नेपाल सिंह, राम सिंह, नरेंद्र सिंह, राम सिंह राजपूत, महेंद्र सिंह, राजेंद्र सिंह, शशांक सिंह, रोशन सिंह, अरविंद सिंह, अनिल कौशिक, जसवंत सिंह, दीप सिंह धनानी, बलवीर सिंह, गिरवर सिंह यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# सि. गो.पाटील महाविद्यालयात करिअर कट्ट्याच्या फलकाचे उद्घाटन

**साक्री । प्रतिनिधी**




येथील वि. वि. मंडळाचे सि,गो. पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अंतर्गत करिअर कट्टा फलकाचे उद्घाटन विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, करिअर कट्टाचे माजी जिल्हा समन्वयक डॉ.सचिन गोवर्धने, आय. क्यू. ए.सी समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख डॉ प्रीतम तोरवणे प्रा. सुरेंद्र मगर व आयोजक करियर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा . मुकेश वळवी, प्रा. संदीप कदम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक व संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील यांनी प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र मार्फत राबविला जाणाऱ्या या उपक्रमाचा ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना फार मोठा फायदा होणार आहे. शिवाय याच बरोबर इतर विविध कोर्से सही त्यांना पूर्ण करता येणार आहे. सदर उपक्रमाचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भावी काळात निश्चितच होणार आहे. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, लाखो रुपये खर्च करून शहरात आता विद्यार्थ्यांना जाण्याची गरज नाही. फक्त ३६५ रुपये भरून सतत १००० दिवसांपेक्षा जास्त दिवस विद्यार्थ्यांना करिअर कट्टा या उपक्रमा मार्फत विविध कोर्सचा फायदा घेता येणार आहे त्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग होण्याचे आवाहन केले. करियर कट्ट्याचे माजी जिल्हा समन्वयक डॉ. सचिन गोवर्धने यांनी करिअर कट्टा उपक्रमांत अंतर्गत चालणाऱ्या पन्नास कोर्सेसची माहिती,व्यावसायिक शिक्षण व स्पर्धा परीक्षेचे महत्त्व या विषयी माहिती दिली सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयीन समन्वयक प्रा.मुकेश वळवी व प्रा. संदीप कदम यांनी केले होते. सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी बांधव व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सर्व घटकांपर्यंत विकास योजना पोहचवणार : आ. काशिराम पावरा

### गावापर्यंत विकास नेल्याबद्दल बोराडीकरांकडून भूपेशभाई पटेल यांचे आभार

**शिरपूर । प्रतिनिधी**



सर्वसामान्य गरजू घटकांना शासकीय योजनांसाठी कार्यालयांमध्ये चकरा मारणे भाग पडू नये, त्यांचा वेळ आणि पैशाची बचत व्हावी या हेतूने आ.अमरीशभाई पटेल व भूपेशभाई पटेल यांनी विकास योजना आपल्या दारी हा आदर्श उपक्रम सुरु केला आहे. त्यामुळे दलालांच्या विळख्यातून गरजूंची सुटका झाली असून त्यांना जागेवर लाभ मिळणे शक्य झाले आहे. येत्या काळात हा उपक्रम आणखी व्यापक केला जाईल, योजनांपासून कोणताच गरजू व्यक्ती वंचित राहणार नाही याची काळजी घेत आहोत अशी माहिती आमदार काशिराम पावरा यांनी दिली.

तालुक्यातील बोराडी येथे २२ जून रोजी अरूणाई पेट्रोल पंप परिसरातील केंद्र शासनाची पीएम किसान सन्मान निधी योजना व आधार अपडेट शिबिर पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपसरपंच राहुल रंधे उपस्थित होते. भाजप युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस मनजीत पवार, सामाजिक कार्यकर्ते रमण पावरा, विशाल पाटील, बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चा तालुका चिटणीस दीपक पावरा, टेंभेपाडाचे सरपंच अशोक पावरा, बुडकीचे सरपंच विश्वास पावरा, न्यू बोराडीचे सरपंच कनसिंग पावरा, गुर्हाळपाणीचे सरपंच राजेंद्र पावरा, उपसरपंच श्रावण पावरा, कुमारसिंग पावरा, राकेश बाफना, उमेश पावरा, हुसेन पावरा,राजेंद्र पावरा,हरी पावरा, डोंगर्या पावरा, भरत पावरा, दिलीप पावरा, गुलाब पावरा आदि उपस्थित होते. चार दिवस चाललेल्या शिबिरात हजारो लाभार्थ्यांनी पीएम किसान निधीसाठी नोंदणी करुन घेतली. त्यासोबतच आधार अपडेट करुन घेण्यासाठीही विद्यार्थी, युवक आणि महिलांनी मोठी गर्दी केली. यावेळी लाभार्थ्यांनी विकास योजना आपल्या दारी उपक्रमाबद्दल भूपेशभाई पटेल यांचे आभार मानले. शिबिरासाठी मंजीत पवार व विकास योजना आपल्या दारीच्या टीमने परिश्रम घेतले.

# एमआयडीसी पोलीस चौकीला आयमातर्फे संगणक संच भेट

**नाशिक । प्रतिनिधी**

अंबड औद्योगिक वसाहत परिसरातील पोलिस चौकीचे कामकाज जलद आणि सुरळीत व्हावे यासाठी या चौकीला अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) च्या माध्यमातून संगणक संच उपलब्ध करून देण्यात आला. तो प्रदान करण्याचा सोहळा आयमा सभागृहात पार पडला.

अंबड औद्योगिक वसाहतीत गुन्हेगारीस तसेच भुरट्या चोऱ्यांना आळा बसावा यासाठी पोलिस अधिकाऱ्यांसमवेत आयमाने नुकतीच उद्योजकांची बैठक बोलाविली होती. त्यावेळी पोलीस चौकीचे निरिक्षक राजू पाचोरकर यांनी सदर चौकी नवीन असल्याने तिला विविध मार्गांनी सहकार्य करण्याचे आवाहन आयमाला केले होते.आयमाच्या माध्यमातून मिळालेल्या संगणक संचामुळे चौकीचे कामकाज सुरळीत चालण्यास मदत होईल. औद्योगिक वसाहत परिसरातील उद्योजकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सर्व ती आवश्यक पावले उचलली जातील. रात्रीची गस्त वाढवली जाईल, असे आश्वासन पोलीस निरीक्षक पाचोरकर यांनी यावेळी दिले.कार्यक्रमास आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, तक्रार निवारण समिती चेअरमन दिलीप वाघ, राहुल गांगुर्डे, जयंत पगार, हेमंत खोंड, पोलीस उपनिरीक्षक पाडेकर, हवलदार गणेश अहिरराव, कॉन्स्टेबल ए. एन. कुऱ्हाडे आदी उपस्थित होते.

CMYK

दैनिक लक्ष महाराष्ट्र





सोमवार, दि. २६ जून २०२३

# छत्रपती संभाजी महाराज नाशिक लोकसभा लढणार















नाशिक

। मनपा महाराष्ट्रातील राजकारण आता खालच्या पातळीवर गेले असून त्यामुळे शब्दफेक यांची एक पटली होती. परंतु ती आता राहिलेली नाही अशी खंत व्यक्त करून स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांनी सांगितले की, शंभर टक्के कार्य करणारे कार्यकर्ते हे स्वराज्याला पाहिजे, माझ्या मागे पुढे फिरणारे कार्यकर्ते नकोत. पक्षासाठी काम करा, संघटनेसाठी काम करा असा सल्ला देऊन स्वराज्य पक्षाच्या कार्यकर्त्यांचे त्यांनी कान देखील यावेळी टोचले. छत्रपती संभाजी महाराज स्वराज्य पक्षाच्या पदाधिकारी मेळाव्यामध्ये काल बोलत होते. स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजीराजे  हे दोन दिवसाच्या नाशिक दौऱ्यासाठी शनिवारी नाशिकमध्ये आले त्यावेळी नाशिकमध्ये शनिवारी सायंकाळी छत्रपती संभाजीनगर रोडवर असलेल्या यश लॉन्स मध्ये स्वराज्य पक्षाच्या पदाधिकारी मेळाव्यात बोलताना छत्रपती संभाजीराजे  अतिशय आक्रमक असे दिसून आले. त्यांना बरं नव्हतं, त्यांच्या अंगामध्ये ताप होता तरी देखील कार्यकर्त्यांमध्ये असलेला उत्साह आणि दिलेला शब्द पाळण्यासाठी मी या मेळाव्याला उपस्थित राहिलो. तुमचा उत्साह पाहून माझ्या अंगातील ताप सुद्धा कमी झाला. असे म्हणत ते म्हणाले की, स्वराज्य ही एक संघटना आहे. तो प्रामाणिक असावा यासारखे बोलून त्यांनी स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांचे कान टोचले आणि संघटनेच्या वाढीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. चांगल्या पद्धतीने नाशिक जिल्हा काम करत असून येणाऱ्या काळात या जिल्ह्याकडून मला खूप अपेक्षा आहेत अशाही भावना त्यांनी केल्या.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





सोमवार, दि. २६ जून २०२३

# विठुरायानं गाऱ्हाणं ऐकलं, पावसाला सुरुवात झाल्यानं वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद















अवघ्या चार दिवसांवरच

आषाढी वारीचा सोहळा आला आहे. या सोहळ्यासाठी विठुरायाची पंढरी सज्ज झाली आहे. वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरपुरात दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. दरम्यान, आषाढी वारीसाठी दिंड्या पंढरपूरकडे निघाल्या की राज्यात पावसाला सुरुवात होत असते. मात्र, यंदा पावसानं चांगलीच ओढ दिली आहे. त्यामुळं पंढरीकडे जाणारे वारकरी आपल्या विठुरायाला राज्यात लवकर चांगला पाऊस पडू दे असं गाऱ्हाणं मांडत होते. अखेर कालपासून राज्यात पावसाला सुरुवात झाली आहे. विठुरायानं आमचं गाऱ्हाणं ऐकलं, वारी सफल झाली अशा भावना वारकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. विठुरायाच्या आषाढी सोहळ्यासाठी लाखोंच्या संख्येनं भाविक पंढरीची वाट चालत आहेत. हजारो भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. बहुतांश वारकरी हा शेतकरी आहे. हे वारकरी जरी वारीसठी पंढरपूरला आले असले तरी त्यांच्या डोक्यात शेतावरील पेरणीची, जनावरांची काळजी घर करुन बसलेली असते. जून महिना संपत येऊनही पाऊस येण्याची चिन्हे नसल्यानं या विठ्ठल भक्तांचा देवाकडे पावसासाठी सातत्यानं धावा सुरु होता. अखेर राज्यातील अनेक भागात पावसाला सुरुवात झाल्यानं भाविकांच्या चेहऱ्यावरील काळजीची जागा आता आनंदाने घेतली आहे. आमच्या देवानं आमचं मागणं ऐकलं आणि पाऊस सुरु झाल्याच्या भावना वारकऱ्यांनी व्यक्त केल्या. आता आषाढी यात्रा आनंदात होणार अशा प्रतिक्रिया भाविकांकडून येऊ लागल्या आहेत.

ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील